# जागतिकीकरण आणि महानगरीय जीवनाचे मराठी कथेतील प्रतिबिंब

**स्नेहा यशवंत देसाई**

सहायक प्राध्यापक, ई. एस. चे आर. एस. एन. कला आणि विज्ञान महाविद्यालय, फार्मगुडी, पोंडा.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17259705

## ABSTRACT:

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात दृढ झालेल्या जागतिकीकरणामुळे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनात अमूलाग्र बदल घडले. १९९१ नंतरच्या नव्या आर्थिक धोरणामुळे औद्योगिकीकरण, स्थलांतर आणि शहरीकरणाच्या प्रक्रियेत वेग आला व त्यातून 'महानगर' ही संकल्पना ठळकपणे पुढे आली. विविध प्रांतांतील, भाषिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या लोकांच्या सहजीवनातून महानगरात मिश्रित संस्कृती आकारली. या नव्या शहरीऔद्योगिक वास्तवाने मराठी साहित्याकडेही लक्ष वेधले.

१९५०६० च्या ग्रामीण साहित्यकेंद्रित प्रवाहानंतर १९७०८० पासून मुंबई, पुणे यांसारख्या शहरांचे जीवनकेंद्री चित्रण सुरू झाले. १९९० नंतरच्या नव्वदोत्तर काळात जयंत पवार, समर खडस, सतीश तांबे, विजय तांबे, पंकज कुरुलकर, मनस्विनी लता रवींद्र, मेघना पेठे आदी लेखकलेखिकांनी महानगरीय जाणीवा कथालेखनातून प्रभावीपणे व्यक्त केल्या. संघर्ष, बेरोजगारी, स्त्रीचे अस्तित्वदर्शन, सामाजिकराजकीय अस्थिरता, तंत्रज्ञानाचा प्रभाव, नात्यांतील तुटकपणा ही केंद्रस्थाने त्यांच्या कथांमध्ये ठळकपणे येतात.

महानगरीय कथेची भाषा ही संमिश्र, प्रयोगशील व काळानुरूप बदलणारी आहे. स्थानिक बोली, स्थलांतरितांच्या भाषिक सवयी, हिंदीइंग्रजी शब्दप्रयोग तसेच माहितीतंत्रज्ञानाशी निगडित संज्ञा या भाषेत गुंफलेल्या आहेत. त्यामुळे महानगरीय कथा ही केवळ आशयदृष्ट्या नव्हे तर भाषिक पातळीवरही आधुनिक, वास्तवदर्शी व वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

## KEYWORDS:

जागतिकीकरण, महानगर, महानगरीय कथा, औद्योगिकीकरण, स्त्रीचे अस्तित्वदर्शन.

**प्रस्तावना:**

'जागतिकीकरण' ही संकल्पना विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात दृढ झाली. 'ग्लोबलायझेशन' हा शब्द जगातील राष्ट्रांमध्ये निर्माण झालेल्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परस्परसंबंधांकडे निर्देश करतो. थिओडोर लेविट यांना या संकल्पनेचे सैद्धांतिक प्रवर्तक मानले जाते. भारतात १९९१ नंतर नवीन आर्थिक धोरण लागू झाले. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या त्रिसूत्रीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत मुलभूत परिवर्तन झाले. वाहतूक,औद्योगिक क्रांतीआणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीमुळे 'वैश्विक खेडे' ही कल्पना वास्तवात उतरल्यासारखी वाटू लागली.

जागतिकीकरणामुळे भारतात संधी उपलब्ध झाल्या पण आव्हाने देखील उभी राहिली. तंत्रज्ञानातील सुविधा, अंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश व शहरीकरणाचा वेग ही सकारात्मक बाजू; तर बेरोजगारी, सांस्कृतिक विघटन आणि कुटुंबसंस्थेतील बदल हे नकारात्मक पैलू ठरले. परिणामी वसाहतींचे स्वरूप बदलले. वाढते औद्योगिकीकरण, त्यासाठी लागणारे श्रमिक हात, उदरनिर्वाहासाठी मोठ्या प्रमाणात झालेले स्थलांतर या सगळयामधून 'महानगर'ही संकल्पना अस्तित्वात आली. विविध भाषिक आणि विविध प्रांतांमधून आलेले लोकसमूह, यांमुळे महानगरात सांकृतिक वैविध्य वाढले आणि त्यातून मिश्रित संस्कृती निर्माण झाली. आधुनिक पंचतारांकित संस्कृतीच्या प्रभावामुळे मुंबईसारख्या महानगरांकडे आकर्षणाची एक नवी लाट निर्माण झाली. महानगरातील लोकसंख्या याच कारणामुळे वाढीस लागली.

**महानगर आणि मराठी साहित्य : परस्पर संबंध**

महानगरे ही केवळ उद्योगधंद्याची केंद्रे किंवा भौगोलिक विस्तार नसून ती एक जिवंत सांस्कृतिक व सामाजिक प्रक्रिया आहे. ग्रामीण समाजरचनेच्या तुलनेत महानगरीय जीवनशैलीत गतिमानता आणि भिन्नता जाणवते. मराठी साहित्यातून वेगवेगळया काळातील हे बदलते स्वरूप टिपले गेले. १९५०६० चे दशक म्हणजे ग्रामीण साहित्याचा सुवर्णकाळ म्हणता येईल. मात्र १९७०७५ नंतर मुंबई, पुणे यांसारख्या शहरांच्या विस्तारामुळे लेखकांचे लक्ष महानगराकडे वळू लागले. तो केवळ एक विषय न राहता मराठी साहित्यात संवेदनांचा केंद्रबिंदू ठरला.

या काळात मराठी कथा अनेक अंगांनी विकसित झाली. साहित्यविश्वात आशय, शैली, कथनपद्धतीतही नव्या प्रवृत्ती जन्माला आल्या.

स्थलांतर, औद्योगिकीकरण, नोकरीसाठीची स्पर्धा, स्त्रीपुरुष नात्यांमधील बदल, एकाकीपणा, एकत्र कुटुंबपद्धतींचा अभाव, आर्थिक असमानता या महानगरातील अनुभवांचे पडसाद मराठी कथेतून उमटू लागले. यातच 'महानगरीय कथा'हा स्वतंत्र प्रवाह निर्माण झाला. १९९० नंतर हा प्रवाह अधिक ठळक झाला. महानगरातील झगमगाटाबरोबरच त्यातील संघर्ष, पराभव, बेरोजगारी, स्त्रीची अस्तित्वलढाई, झोपडपट्ट्यांचे प्रश्न हे सर्व विषय मराठी कथाकारांनी संवेदनशीलतेने हाताळले आणि म्हणूनच महानगरातील गुंतागुंत सूक्ष्मतेने पकडण्यासाठी मराठी कथा हे महानगरीय साहित्याचे मुख्य माध्यम ठरले.

**नव्वदोत्तर महानगरीय कथांतील जाणीवा:**

नव्वदोत्तर काळात जयंत पवार, समर खडस, सतीश तांबे,विजय तांबे, जी. के. ऐनापुरे, पंकज कुरुलकर, मनस्विनी लता रवींद्र, मेघना पेठे, मोनिका गजेन्द्रगडकर, किरण येले, प्रणव सखदेव या लेखकलेखिकांच्या कथांतून महानगरीय जाणीव व्यक्त होऊ लागली. त्याआधी १९८० च्या दशकात भाऊ पाध्ये आणि ह. मो. मराठे यांच्या कथांमधून या जाणीवा विस्तृतपणे येऊ लागल्या होत्या. कनिष्ठ मध्यमवर्गीयांच्या संघर्षाचे चित्रण, महानगरातील माणसाविषयी सहानुभूती प्रकट करणारे त्यांचे कथालेखन होते. १९९० नंतरचा काळ हा सर्वच दृष्टीने परिवर्तनाचा, स्थित्यंतराचा काळ असल्याने; बदलती जीवनशैली, आधुनिकीकरण, यंत्र संस्कृती व आर्थिक घडामोडींचा मानवी जीवनावरील परिणाम या काळातील कथा साहित्यातून प्रकर्षाने जाणवतो.

मराठी साहित्यविश्वात जयंत पवार हे एकाच वेळी कथाकार, नाटककार आणि पत्रकार म्हणून परिचित असलेले लेखक आहेत. भाऊ पाध्येंच्या कथांचा त्यांच्यावर खोलवर प्रभाव दिसून येतो. गिरणी संप, जातीय दंगल, जागतिकीकरणाचे परिणाम अशा घटनांनी त्यांच्या कथालेखनावर ठसा उमटवला. 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर'आणि 'वरनभात लोन्चा नि कोन नाय कोन्चा'या दोन कथासंग्रहांचा विचार

केल्यास, महानगरातील माणसांची कोंडी, सततची धावपळ, हिंसाचार, जगण्यासाठीची धडपड, श्रमजीवी वर्गाच्या आशा अपेक्षा, तसेच नैतिकतेचा ऱ्हास ही सूत्रे त्यांच्या लेखनात ठळकपणे आढळतात. त्यांच्या कथेतून केवळ मुंबईचे महानगरीय वास्तवच नाही तर बदलत्या संदर्भातील विविध प्रश्नही पुढे येतात. बॉम्बस्फोट आणि दहशतवादी कारवाया, स्त्रियांवरील अत्याचार, भाषिक व धार्मिक वाद, कौटुंबिक संघर्ष, समकालीन समाज आणि त्यातील बदल याचे दर्शनही त्यांच्या लेखनातून घडते. 'छटाकभर रात्र तुकडा तुकडा चंद्र', 'चंदूच्या लग्नाची गोष्ट' या कथांमधून रेडलाईट एरिया यांचे संदर्भही व्यक्त होतात.

१९९० च्या दशकात उदयाला आलेल्या कथाकारांमध्ये सतीश तांबे हे नाव देखील वाचकांना परिचित होत गेले. 'राज्य राणीचं होतं', 'माझी लाडकी पुतना मावशी', 'रसातळाला ख. प. च.', 'मॉलमध्ये मंगोल', 'ना. मा. निराळे' हे कथासंग्रह त्यांच्या लेखानप्रवासाचा ठसा उमटवतात. त्यांच्या कथांमधून वास्तव आणि कल्पना यांची सांगड तसेच सूक्ष्म चिंतन ही वैशिष्ट्ये जाणवतात. समकालीन साहित्यातील दुर्लक्षित, सामान्य माणसाची छळवणूक करणारे प्रश्न ते प्रभावीपणे मांडतात. सामाजिक व राजकीय जीवनातील घटनाप्रसंग, बदलत्या शहरी जीवनाचा विविधांगी पट, वेगवान बदलांमुळे माणसांच्या मनात निर्माण होणारा गोंधळ, ताणताणाव आणि संघर्ष हे विषय त्यांच्या'लाल नदीचे मूळ', 'दाउद संताजी,हर्षद धनाजी' यांसारख्या कथा ठळकपणे व्यक्त करतात. मुंबईतील धावपळ, कुरूपता, बकाल वास्तव, व्यसनाधीन माणसे या जीवनजाणिवा त्यांच्या कथांचा भाग बनतात.

नव्या पिढीतील महत्त्वाचे कथाकार म्हणून पंकज कुरुलकर यांचे नाव विशेषत्वाने घेतले जाते. 'रॅटसेज', 'डायरी', 'तमसो मा...', 'साकी बार अँड रेस्टॉरंट', 'अनादी अनंत', 'अंधाराच्या दाही दिशा', 'चिरंतन दुःखाचे स्रोत'हे त्यांचे उल्लेखनीय कथासंग्रह आहेत. त्यांच्या कथालेखनात बदलत्या काळाचे वास्तव प्रकर्षाने प्रतिबिंबित झाल्यामुळे वाचक तसेच समीक्षक या दोघांचेही लक्ष त्यांनी वेधून घेतले. शहरी आणि महानगरी जीवनातील व्यथा, अस्वस्थता व समाजातील ताणतणाव हे त्यांच्या कथांचे केंद्रभूत सूत्र ठरते. आधुनिक शहरी जीवनमानामुळे भौतिक सुविधा सहज उपलब्ध झाल्या असल्या तरी समाजाशी असलेले नाते सैलावत आहे आणि अंतर्मनाशी असलेला संवादही कमी होत चालेलेला

आहे; हा विरोधाभास त्यांच्या लेखनातून स्पष्ट जाणवतो. अशा प्रकारे बाह्य वैभव आणि अंतर्गत शून्यता यामधील संघर्ष त्यांनी आपल्या कथांमधून मांडला आहे. म्हणूनच त्यांचे कथालेखन हे केवळ मनोरंजनपर न राहता, आधुनिक शहरीमहानगरी जीवनाचे दस्ताऐवज म्हणून अभ्यासले जावे इतके महत्त्वपूर्ण ठरते.

समर खडस यांचा 'बकऱ्याची बॉडी'तर विजय तांबे यांचे 'ज्याचा त्याचा'व 'सहजतेच्या त्रासाची सुरुवात'हे कथासंग्रह बदलत्या सामाजिकराजकीय वातावरणाने निर्माण केलेली असुरक्षितता, भीती व दहशत यांचे प्रभावी चित्रण घडवतात. विशेषतः संघटनात्मक चळवळी, राजकीय हालचाली आणि त्यांच्या परिणामी घडणारे सामाजिक बदल हे विषय त्यांच्या कथांमधून प्रखरतेने प्रतिबिंबित होतात. खडस यांचे राजकारणाविषयीचे सूक्ष्म भान त्यांच्या कथांना वेगळेपण प्राप्त करून देते. जयंत पवार समर खडस यांना "भाऊ पाध्ये यांचे चांगल्या अर्थाने साहित्यिक वंशज"असे संबोधतात कारण भाऊ पाध्ये यांच्या लेखनात निवेदनशैलीतून जीवनानुभव मांडण्याची जी परंपरा आहे तोच वारसा यांच्याही लेखनात नव्या अर्थाने पुढे आलेला जाणवतो. सत्ताकारण, लैंगिकता, महानगराच्या संदर्भातील दैनंदिन वास्तव आणि समकालीन समाजाचे बदलते स्वरूप यांचे सशक्त दर्शन घडते.

जी. के. ऐनापुरे हे नव्वदोत्तर काळातील महत्त्वपूर्ण आणि लक्षणीय लेखक आहेत. 'सर्पसावल्या (खंगोल)', 'कांदाचिर', 'झिंझुरडा', 'स्कॉलर ज्यूस', 'निकटवर्तीय सूत्र'हे त्यांचे कथासंग्रह. मुंबईत स्थापन झालेल्या वसाहतींमध्ये महाराष्ट्रासह देशभरातून कामगार मोठया प्रमाणात स्थायिक झाले. चाळी, झोपडपट्ट्या आणि त्यातून उभ्या राहिलेल्या स्वतंत्र महानगरी संस्कृतीचे दर्शन ऐनापुरे यांच्या कथांमध्ये घडते. मुंबईतील गिरण्यांचा संप, त्यानंतर झालेली गिरण्यांची बंदी आणि त्यातून लाखो कामगार उध्वस्त होत गेले ही घटना ऐनापुरे यांच्या'जंतू', 'स्पाझम', 'सर्व्हिस'या कथांच्या केंद्रस्थानी येते.

सुकन्या आगाशे यांचे 'न लिहिलेली पाने', 'इस्पितळ आणि पतंग उडवणारा माणूस'हे महत्त्वाचे कथासंग्रह ठरतात. त्यांच्या लेखनामधून महानगरीय जीवनातील यांत्रिकता, सततची पुनरावृत्ती, मानवी संवेदनशिलतेचा होणारा ऱ्हास यांचे प्रभावी चित्रण दिसते. तर

मनस्विनी लता रवींद्र या समकालीन लेखिकेचा ‘ब्लॉगच्या आरश्यापल्याड’हा कथासंग्रह महानगरीय कथाविश्वातील नवे पाऊल मानला जातो. जागतिकीकरणानंतरच्या काळातील सामाजिक वास्तवाकडे निर्भीडपणे पाहण्याचे सामर्थ्य त्यांच्या कथालेखनात आढळते. विशेषतः महानगरातील नातेसंबंधातील तुटलेपणा, एकाकीपणाची भावना, जीवनातील संघर्ष, असहायता, मानसिक थकवा, यांचे वास्तववादी चित्रण यांच्या कथांमधून समोर येते.

प्रणव सखदेव यांच्या कथालेखनात समकालीन जीवनातील वास्तवदर्शी चित्रण आढळते. पात्रांची रचना, प्रसंगांची मांडणी, भाषेतील लवचिकता आणि निवेदन तंत्रातील आधुनिकता हे सर्व पैलू कथेला नाविन्य प्राप्त करून देतात. याचबरोबर, अलीकडच्या काळात मराठी कथांचे दालन समृद्ध करणाऱ्या लेखकांमध्ये किरण येले हे नाव विशेषत्वाने घ्यावे लागते. येले यांच्या बहुतेक कथा सर्वसामान्य स्तरातील पात्रांची कहाणी सांगतात. ही पात्रे विशिष्ट सामाजिक किंवा मानसिक परिस्थितीत अडकलेली, असहाय्य असली तरी परिस्थितीवर मात करण्यासाठी, जगण्याला नव्याने उभारी देण्यासाठी सतत प्रयत्नशील राहतात. या वैशिष्ट्यांमुळे त्यांच्या कथेतून सकारात्मकतेची धार प्रकट होते.

याशिवाय मेघना पेठे, मोनिका गजेन्द्रगडकर, मिलिंद बोकील, प्रतिमा जोशी या लेखकलेखिकांच्या कथालेखनातून काही प्रमाणात महानगरीय जाणिवेचे प्रकटन घडलेले आहे. त्यांच्या लेखनात शहरातील धकाधकीचे, नात्यांतील तुटकपणाचे, एकाकीपणा व त्यातून आलेले शरीर सुखाचे संदर्भ आणि बदलत्या मानसिकतेचे प्रतिबिंब उमटते. नव्वदोत्तर काळात सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात जे व्यापक परिवर्तन घडले त्याचे साक्षेपी दर्शन घडविणारे हे कथाकार ठरतात. यांच्या लेखनातून महानगरीय जीवनजाणिवांचे एक बहुआयामी रूप स्पष्ट होते.

**महानगरीय कथेचे भाषिक विशेष:**

महानगरीय कथेची भाषा ही संमिश्र स्वरूपाची असून ती विविध बोली व भाषिक संपर्कातून निर्माण झालेली आहे. मुंबईसारख्या शहरात वेगवेगळया प्रांतांतील लोक एकत्र येतात, त्यामुळेया भाषेत स्थानिक

बोलींचे सूरही आहेत आणि स्थलांतरितांच्या भाषिक सवयींचे प्रतिबिंबही जाणवते.शहराच्या बदलत्या जीवनपद्धतीमुळे भाषेत यांत्रिकतेचे, आधुनिकतेचे आणि उपभोगतावादीसंस्कृतीचेपडसाद या कथांमधून उमटतात. चाळसंस्कृती, झोपडपट्ट्या किंवा कामगारवर्गीय जीवन यांसारख्या अवकाशांमध्ये खास बोली, भाषिक रूपे कथेत आढळतात. तर दुसरीकडे व्यावसायिक क्षेत्र, उद्योगधंदे,हॉटेल व्यवसाय आदींच्या भाषाही कथांत सामील झालेल्या आहेत.

महानगरीय कथांमध्ये हिंदी व इंग्रजी शब्दांचा मुक्तपणे वापर होतो, कारण रोजच्या संवादातच ही भाषिक पद्धत घट्ट रुळलेली आहे. ग्रामीण व दलित साहित्यप्रवाहाशी तुलना करता महानगरीय भाषेला एक वेगळा ठसा प्राप्त झालेला जाणवतो.नव्या शतकात माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे कथाभाषेत संगणक, इंटरनेट, ब्लॉग, संकेतस्थळे यांसारखी संज्ञा आपोआप सामील झाल्या आहेत. पंकज कुरुलकरांसारख्या लेखकांनी या भाषेला नवा स्वर दिला असून त्यामुळे महानगरीय कथा भाषिकदृष्ट्याही आधुनिक आणि काळाशी सुसंगत ठरते.

**समारोप:**

नाव्दोत्तर काळात महानगरीय वास्तव नवनव्या अंगांनी बदलत गेले. त्या बदलांचा मागोवा कथालेखनातून घेताना कथाकारांनी आशयसूत्र, पात्रनिर्मिती, संवाद, निवेदन व भाषाशैली यांसारख्या घटकांचा प्रभावी उपयोग केला. त्यामुळे महानगरीय कथेला वेगळ्या स्वरूपाची जाणीव निर्माण झाली. समकालीन जीवनातील विविध पैलू या कथनातून ठळकपणे प्रकट होतात.

महानगरातील ताणतणाव, संघर्ष, विसंगती आणि माणुसकीचा शोध हेच या कथाकथनाचे केंद्रभूत विषय ठरतात. त्यामुळे या कथांची भाषा एकसूत्री न राहता विविधतेने नटलेली आहे. महानगरीय बोलींचा वापर, नव्या भाषिक प्रयोगांची शैली, उपरोध आणि संवादातील वास्तवता यामुळे ही कथा विशिष्ट ठरते. तिच्यातील प्रयोगशीलता आणि वेगळेपण हे या कालखंडाच्या भाषिक वैशिष्ट्यांमधून दिसून येते.

**निष्कर्ष:**

1. १९७५ पासून सुरू झालेला महानगरीय कथेचा प्रवाह १९९० नंतर

अधिक विस्तृत झाला. या काळात कथा, कविता आणि कादंबरीतून महानगराशी निगडीत जाणिवा प्रखरपणे व्यक्त होऊ लागल्या.

2. जागतिकीकरण, तंत्रज्ञान, माध्यमक्रांती आणि बदलती सामाजिकआर्थिक परिस्थिती या सर्वांचा परिणाम १९८० नंतरच्या कथालेखनात जाणवतो. या कथांमधून केवळ वैयक्तिक वेदना नव्हे तर सामाजिक वास्तवाचे विविध पैलूही प्रकट होतात.

3. जयंत पवार, समर खडस, पंकज कुरुलकर, सतीश तांबे यांसारख्या लेखकांनी महानगरीय कथेला ठोस रूप दिले. त्यांनी सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनाचे तपशील पकडून अभिव्यक्तीला नवी दिशा दिली.

4. मनस्विनी लता रवींद्र, सुकन्या आगाशे, मोनिका गजेन्द्रगडकर, प्रतिमा जोशी अशा लेखिकांनी महानगरीय कथाविश्वात नवी भर घातली. त्यांच्या कथांमधून नात्यांचे गुंतागुंतीचे पैलू, एकाकीपणा आणि संवेदनशीलतेचे क्षण प्रभावीपणे चित्रित झाले.

5. साठोत्तरी कथेशी तुलना करता नव्वदोत्तरी कथा अधिक बहुरंगी व समाजाभिमुख ठरते. आशयविषयाचा विस्तार, शैलीतील प्रयोगशीलता आणि महानगराच्या बहुपेडी जीवनाचे चित्रण ही या कथेची वैशिष्ट्ये ठरतात.

6. साहित्यकृती ही मुळात भाषिक कलाकृती असल्याने महानगरीय कथासाहित्याचा भाषिक अंगाने अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरतो. सामाजिक स्तरांनुसारभाषेत भिन्नता दिसते. विविध समूहांच्या बोली, त्यांच्या संवादशैली, व्यावसायिक क्षेत्राशी निगडित शब्दसंपदा यांमुळे भाषेत वैशिष्ट्यपूर्ण विविधता येते. मुंबईसारख्या महानगरातील संकरित बोली व संस्कृती कथालेखनातून स्पष्टपणे प्रकट होते.

7. १९८०–९० नंतरच्या काळातील महानगरीय कथा दृश्यात्मक, चिंतनशील, उपरोधात्मक, संवादप्रधान अशा विविध पातळ्यांवर भाषेचे नवे प्रयोग करताना दिसते. क्रियापदांचा वापर, म्हणीवाक्प्रचारांचे प्रभावी निवेदन, तसेच बोलींच्या माध्यमातून जीवनातील ताणतणाव, संघर्ष, आधुनिकता आणि मानवी

नात्यांतील गुंतागुंत प्रभावीपणे मांडली जाते. या प्रयोगशीलतेमुळे आणि भाषिक वेगळेपणामुळे महानगरीय कथा विशिष्ट ठरते.

**संदर्भ ग्रंथ:**


1. कोत्तापल्ले, नागनाथ, आणि दत्ताभगत.जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य. सायनपब्लिकेशन, २०१७.
2. नन्नवरे,भाऊसाहेब.१९८०नंतरच्यामहानगरीयकथेचाअभ्यास. शिवाजीविद्यापीठकोल्हापूर, २०१९.
3. पोवार, छाया.मराठी नागरकथा.स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, २००३.
4. कुलकर्णी, अजय. नव्वदोत्तर मराठी साहित्य.विजय प्रकाशन, २०१८.
5. हातकणंगलेकर, म. द. मराठी कथा रूप आणि परिसर.श्रीविद्या प्रकाशन,२००८.


**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.